# १९९१ च्या मुक्त अर्थव्यवस्थेचे मराठी कादंबरीवर झालेले आर्थिक परिणाम.

**डॉ. प्रशांत बाबाराव सूर्यवंशी** मराठी विभागप्रमुखपुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय नरसाळा रोड नागपूर —३४

**प्रस्तावना**

१९९१ नंतर भारतात मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारल्या गेले. या अर्थव्यवस्थेमुळे सर्वच क्षेत्रावर परिणाम झाला हा परिणाम वेगवेगळ्या स्वरूपाचा होता सांस्कृतिक परिणाम झाला राजकीय परिणाम झाला धार्मिक परिणाम झाला त्याचप्रमाणे आर्थिक सुद्धा परिणाम झाला आर्थिक परिणामांमध्ये सर्वच क्षेत्रे प्रभावित झाली त्यामध्ये साहित्याचे क्षेत्रही प्रभावित झाले प्रामुख्याने कादंबरीच्या आशयावर या बाबीचा मोठा परिणाम झाला कादंबरीत सामाजिक ऐतिहासिक पोराने या बाबींचा उल्लेख होत होता मात्र या आर्थिक धोरण नंतर कादंबरीच्या आशयामध्ये १९९१ नंतर अत्यंत वेगाने अनेक बदल होऊ लागले. जागतिकीकरण उदारीकरण व खाजगीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली मुक्त अर्थव्यवस्थेला उभी करणारी ही प्रक्रिया आरंभ झाल्याने देशात बहुराष्ट्रीय कंपन्या केंद्रस्थानी आल्या संगणक व दूरसंचार यांचा विस्तार सुरू झाला उपग्रह संपर्क व्यवस्था वाढीस लागली यामुळे जागतिक संस्कृती भारतात आली आणि या नव्या संस्कृतीच्या आगमनाने येथील सामाजिक सांस्कृतिक व धार्मिक मूल्यांमध्ये सुद्धा बदल दिसू लागले या सर्व बदलांचा भारतीय समाज जीवनावर प्रभाव पडला येथील शहरी स्त्रियांच्या पेहरावात व राहणीमानात बदल होऊ लागले त्यांचे जीवनमान पुर्वी पेक्षा वेगळे झाले.

समाजात होणारे हे अमुलाग्र बदल साहित्यात अनेक क्रमप्राप्तच होते म्हणून कविता कथा नाटक आणि कादंबरी या सर्व साहित्य प्रकारात समाज बदलांचे हे पडसाद उमटलेले जाणवतात.

**उदिष्टे**

- मुक्त भारतीय अर्थव्यवस्थेचे परिणाम विशद करणे.
- १९९१ नंतर समाजात झालेले बदल कादंबरीतून कसे अविष्कृत झाले हे दाखवणे.
- कादंबरीच्या आशयामध्ये आर्थिक बाबींचा समावेश झाला हे स्पष्ट करणे.
- महानगरीय कादंबरीत झालेले बदल स्पष्ट करणे.
- कादंबरीच्या व्यक्तिरेखे पैकी स्त्री व्यक्तिरेखेवर झालेला अधिक परिणाम स्पष्ट करणे.

विषयाची मांडणी

कादंबरीला समकालीन वास्तवाचा कलात्मक आलेख असं म्हणतात मराठी कादंबरीच्या आरंभापासून स्त्री समस्या स्त्री जीवन यांचे चित्रण दिसते. बाबा पद्मनजी यांच्या यमुना पर्यटन मधील तत्कालीन विधवांच्या समस्या किंवा हं आपटे यांच्या कादंबऱ्यातून स्त्री शिक्षणाचा आरंभ इत्यादी सर्व सामाजिक समस्या कादंबरीने आपल्या आशयामध्ये अविष्कृत केल्या आहेत. मराठी कादंबरीच्या इतिहासात ही सामाजिकता वेगवेगळ्या प्रकारे प्रगट होत आली आहे कधी ती वास्तव दर्शनाच्या निमित्ताने समाज प्रबोधनासाठी अवतरली कधी ती समस्याचे गांभीर्य लक्षात आणून देण्यासाठी सरसावली कधी तिने वाचकांच्या मनातील प्रक्षेप जागृत केला कधी त्या सर्व परिणामांना कवेत घेऊन नव्या जीवनदर्शनाचे क्षितिज दाखवत राहिली नव्या मूल्यांची पाठराखंड क्रियाशीलतेची प्रेरणा देण्याचे कार्य आणि सूचकतेप्रमाणेच स्पष्टते मधून व्यक्त होणारे ध्येय मराठी कादंबरीने सातत्याने प्रगट केले आहे.

मुक्त अर्थव्यवस्थेनंतर मात्र कादंबरीने आपला आशय हा आर्थिक स्वरूपाचा घेतला आहे आणि त्यातल्या त्यात कादंबरी मधील स्त्री जीवनावर याचा अमुलाग्र बदल झालेला आढळतो. १९९१ नंतरच्या काळातील बदल प्रथम दिसतात ते आर्थिक क्षेत्रात स्त्रियांचे जीवन त्यामुळे विविध स्तरांवर प्रभावित झाले. चंगळवादाने स्त्रियांना आकर्षित केले. याचे चित्रण व त्याची मीमांसा अनेक कादंबऱ्यातून स्पष्ट होते. शाम मनोहर यांच्या श्खूप लोक आहेत श(२००२) या कादंबरीतील श्अंजूश ही शहरातील घरकाम करणारी मोलकरीण महाग अंतर वस्त्रे सौंदर्यप्रसाधने चपला याबाबत आकर्षण व्यक्त करते. त्यातीलच संतोष नावाची तरुणी पैसे मिळविणे खाणे नटणे टाईमपास करणे एवढेच तिच्या बुद्धीचे प्रोग्राम्स असल्याचे सांगते. कविता महाजन यांची भिन्न (२०१०) या कादंबरीत अनेक व्यक्तिरेखा उभ्या केल्या आहेत. व त्याद्वारे महानगरातील स्त्रियांचे बदलते आर्थिक जीवन व त्यांचे विविध पैलू स्पष्ट केले आहेत. रचिता, विभा, प्रतीक्षा, लेनिना, या वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रिया आहेत जिम, ब्युटी पार्लर, असे अर्थार्जनाचे अनेक

नवे मार्ग स्त्रीला दिसत आहेत. समाजसेवेचे क्षेत्र ही उपलब्ध आहे. शहरी स्त्री अर्थाजन आवश्यक गरज म्हणून करतानाच चंगळवादात नकळत गुरफट जाते, हेही या कादंबरीने प्रेक्षकांसमोर मांडलेले आहे. गरीब अशिक्षित स्त्रिया व सुशिक्षित स्त्रिया देखील वेश्याव्यवसाय स्वीकारतात , असे या कादंबरीतून दिसते. विश्राम गुप्ते यांची नारी डॉट कॉम २०१० या कादंबरीतील सुशिक्षित तरुणी पॉकेट मनी करिता कॉल गर्ल म्हणून काम करते नव्वदोत्तर काळातील स्त्रियांवर पैशाची निकड म्हणून कुटुंबाकरिता वेश्याव्यवसाय पत्करण्याची वेळ आल्याचे कुठे दिसते तर कुठे चंगळवादाच्या आहारी जाऊन जुनी मूल्य विसरत विचारहीन दिशाहीन होणाऱ्या स्त्रियांचे चित्र येते.

नव्वदोत्तर कालखंडात आर्थिक स्वातंर्त्यातून चंगळवाद फोफाळतो आहे, हे छाया दातार यांचे मत उल्लेखनीय आहे. केवळ शहरी जीवनातच नव्हे तर ग्रामीण अशिक्षित स्त्रीला देखील त्याचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत हे चित्र कादंबरीतून आलेले आहे. सदानंद देशमुख यांच्या तहान या कादंबरीतील त्यातील रत्ना ही कपडे, सिनेमा, थम्सअप, यासारख्या गोष्टींकरिता स्वत:चे शरीर देते. प्रेम लग्न या बाबींचा विचारही येथे येत नाही. मध्यमवयीन रामकोर व तिची मुलगी वर्षा यांना देखील टीव्हीवरील मनोरंजन व चमचमीत जेवण यांचे आकर्षण आहे. ग्रामीण जीवनातील मूल्यांची पडझड स्पष्ट करणाऱ्या या स्त्रिया आहेत पैसा चौन व स्वार्थ यांची अधिक ओढ नव्वदोत्तर काळात स्त्रीला ग्रासत आहे याचे चित्र अनेक कादंबरीकारांनी केलेले आहे. प्रगत तंत्रज्ञानामुळे आज नव्या गोष्टी शहरे व खेडी यात एकाच वेळी पोहोचत आहे. नव्वदोत्तर कालखंडात बदललेल्या आर्थिक जीवनामुळे स्त्रियांचे वैवाहिक व कौटुंबिक जीवन बदललेले आहे तिच्या लैंगिक जीवनातील बदलही बद्दलही अनेक कादंबरीकरांनी टिपले आहेत. आर्थिक स्वातंर्त्यामुळे नको असलेल्या विवाह बंधनात अडकून न पडता अपत्या सोबत स्वतंत्र राहणाऱ्या स्त्रिया दिसतात, तसेच मिलिंद बोकील यांच्या श्रणश मधील रेहाना, भिन्न मधील लेनिना, विवाह बंधन न स्वीकारता एकटेच राहण्याचा विचार करतात.

शहरी भागाप्रमाणेच ग्रामीण भागातील करणाऱ्या कादंबऱ्या मधील आशय सुद्धा आर्थिक बाबींचा परिणाम झालेला आढळतो नव्वदोत्तर काळात ग्रामीण समस्या वाढल्या आहेत. शेतीची अवस्था बिकट झाली आहे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहे या सर्वांचा ग्रामीण स्त्री जीवनावर होणारा परिणाम अनेक कादंबऱ्यातून वाचकांना अस्वस्थ करीत राहतो अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट या कादंबरीतील वैफल्यग्रस्त शेतकरी यशा नाना याची पत्नी पार्वती मुलगी उषा यांचे चित्र अस्वस्थ करणारे आहे.

सारांश

नवदोत्तर काळखंड हा जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण या प्रक्रियेमुळे मुख्यता प्रभावित आहे. या प्रक्रियेने आर्थिक समाज जीवन प्रभावित झाले आहे. त्यामुळे कादंबरीतील समाजजीवन सुद्धा प्रभावित झालेले आढळते. पुरुषांप्रमाणेच स्त्री शिक्षण व स्त्रीचे अर्थार्जण या दोन बाबींमुळे कादंबरीवर त्या कालखंडातील प्रभाव दिसणे क्रमप्राप्त आहे. तसेच पारंपारिक मूल्य व नवी मूल्य यांच्या संघर्षात संपूर्ण कादंबरीतील जीवन हे भरडले जाताना दिसते व्यक्तीवादाकडे झुकल्याने समूह भावनेतील सुरक्षितता यापासून हे समाज जीवन दूर जात आहे, पारंपारिक समाज रचनेचा प्रभाव काही प्रमाणात आढळतो. मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणामुळे ग्रामीण व नागरी समाज जीवन प्रभावित झालेले कादंबऱ्यातून आढळते संपूर्ण मानवी जीवनावरच या अर्थव्यवस्थेचा परिणाम झाल्यामुळे तो परिणाम कादंबरीच्या आशेवर झालेला आढळतो यापूर्वी कादंबऱ्यातून पौराणिक ऐतिहासिक संदर्भ येत होते पण या मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणानंतर मात्र ग्रामीण भागातील समाजजीवन त्यांची आर्थिक परिस्थिती आणि शहरी भागातील समाजजीवन आणि त्यांची आर्थिक परिस्थिती तसेच महानगरातून येणारा समाज आणि त्यांच्या मधून गरीब श्रीमंत ही वाढत जाणारी दुफळी अनेक महानगरीय कादंबऱ्यातून चित्रित होताना दिसते असे वेगवेगळे परिणाम १९९१ च्या मुक्त अर्थव्यवस्थेचे मराठी कादंबरीवर झालेले आढळून येतात.

संदर्भ ग्रंथ

१. महानगरीय कादंबरीचे मुक्तचिंतन. प्रशांत सूर्यवंशी, युरो वर्ल्ड पब्लिकेशन, मुंबई ,—२०२१.
२. स्त्रीसमस्या वैचारिक प्रवास व वादविवाद —डॉ. छाया दातार.
३. नव्वदोत्तर मराठी साहित्यश संपादक —अजय कुलकर्णी व इतर, विजय प्रकाशन नागपूर २०१८.
४. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या. आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे. १९७९.
५. मराठी साहित्यरू प्रेरणा व स्वरूप— चंद्रकांत बांदिवडेकर, पॉप्युलर प्रकाशन.